(असाधारण)

शनिवार, दिनांक १९ मार्च, २०२२

अधिसुचना

क्र. ३०/२०२२ दिनांक : १९ मार्च, २०२२

विषय :- शासकीय /अशासकीय अनुदानित महाविद्यालय / संस्थेमधील अभ्यागंत / तासिका तत्वावरील नियुक्त शिक्षकांचे मानधन वाढीबाबत शासन निर्णय तसेच सदर शासन निर्णयामधील मानधानाचे दर विना अनुदानित महाविद्यालयांना लागू करण्याबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्र. संक्रिर्ण ï २०२१/(७५/२१)/१/मशि-३, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने उपरोक्त विषयान्वये शासन निर्णय क्र. टीईटी ï २००८ (१८३/०८)/तशि-३, दिनांक ५ नोव्हेबर २००८ निर्गमित केले आहे.

आणि

ज्याअर्थी शासनाने सुधारीत शासन निर्णय क्र. २०१८/(१८५/१८)/मशि-३, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ निर्गमित केले आहे.

आणि

ज्याअर्थी विद्यापीठाने वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने सर्व अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयासाठी विनियम क्र. ०२/२०२० दि.२७ ऑगस्ट, २०२० निर्गमित केले आहे.

आणि

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संदर्भाकिंत शासन निर्णय निर्गमित करुन सर्व शासकीय/अशासकीय अनदानित महाविद्यालयामधील अभ्यागंत / तासिका तत्वावरील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी नियुक्त शिक्षकांचे मानधनात दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ पासुन वाढ केली आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांची माहिती व त्यानुसार कार्यवाहीस्तव अधिसुचित करण्यात येत आहे की,

१) उपरोक्त शासन निर्णय सर्व संबंधित शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयाला लागू करण्यात आला आहे. तसेच अशासकीय विना अनुदानित महाविद्यालयांना सदर वाढीव दर व्यवस्थापन परिषदेने दिनांक २२/०२/२०२२ च्या सभेत विषय क्र. १८ अन्वये लागु केले आहे.

शासनाने वाढ केले सुधारीत दर खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	अभ्यासक्रमाचा प्रकार	सुधारीत दर (प्रति तासाकरीता)	
		सैव्दांतिक	प्रात्यक्षिके
१	कला, वाणिज्य, विज्ञान (पदवी)	रु. ६२५/-	रु. २५०/-
२	कला, वाणिज्य विज्ञान (पदव्युत्तर)	रु. ७५०/-	रु. ३००/-
३	शिक्षणशास्त्र आणि शारिरीक शिक्षण (पदवी/पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम)	रु. ७५०/-	रु. ३००/-
४	विधी (पदवी /पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमा)	रु.७५०/-	रु. ३००/-

२) सदरहु सुधारीत दर दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ पासुन अनुज्ञेय राहील.

३) वरील सुधारीत दर खालील अटींच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आले आहे.

(अ) शासकीय महाविद्यालये/संस्था यामधील अभ्यांगत/तासिका तत्वावरील शिक्षकांसाठी उपरोक्त दिनांक ५ नोव्हेबर, २००८ च्या शासन निर्णयामधील नमुद अटी कायम राहतील.

(ब) अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी अभ्यांगत/तासिक तत्वावरील शिक्षकांना उपरोक्त दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद अटी कायम राहतील, आणि विना अनुदानित महाविद्यालयाला सदर शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद सर्व अटी (अट क्र. २,७ व ११ वगळुन) लागु राहतील.

स्वा/-
(डॉ. तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ